J

IAP IGR Issue: XI, Vol. I | IMPACT FACTOR 5.83 | ISSN 2347-6834 Nov. 2018 To April 2019

# INDEX


| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | Recent Trends In E-Commerce<br>**Dr. Mrunal A. Mule** | 1 |
| 2 | Concept Of E-Commerce<br>**Dr. Sunita S. Yadav** | 5 |
| 3 | Digital Payments System In India<br>**Supriya C. Gaikwad** | 9 |
| 4 | Challenges And Issues Of GST<br>**Stephen Pillai** | 19 |
| 5 | Economic & Social Development Through Sport Sector In India<br>**Dr. Veena Prasad** | 26 |
| 6 | Depreciation Of Rupee: Causes And Impact<br>**Rashmi V. Singh** | 30 |
| 7 | Performance And Problems Of Internet Banking In India<br>**Jotsna S. Chaurasiya** | 35 |
| 8 | Major Thematic Concerns In The Poetry Of Kamala Das : A Study<br>**Jay Ganpat Chavan** | 41 |
| 9 | नरेन्द्र कोहली का व्यक्तित्व एक अनुशिलन<br>**रमा मनाडे** | 46 |
| 10 | आत्मवादाचे खंडण<br>**डॉ. एस. एम. सोनोने** | 53 |
| 11 | रसप्रक्रिया स्वरुप विवेचन : एक अभ्यास<br>**डॉ. उन्मेष शेकडे** | 57 |

IMPACT FACTOR
5.83

ISSN 2347-6834
Indo Global Researchers (IGR)
Issue : XI, Vol. I
Nov. 2018 To April 2019
www.irasg.com

Research Paper 10 Pali

# आत्मवादाचे खंडण

**डॉ. एस. एम. सोनोने**
**पालि विभाग प्रमुख, राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर, जि. लातूर**

विविधतेने नटलेल्या परंतु विषमतेने फाटलेल्या या भारतीय संस्कृती मध्ये विविध धर्म, तत्व सिद्धांत मानवी मन व मेंदूला गोंधळात टाकतात बरेच सिद्धांत हे कल्पनेवर आधारलेले किंवा भिती पोटी निर्माण झालेले आहेत. विविध रुढी, प्रथा, परंपरा, अंधश्रद्धा, देव–दैव, आत्मा–परमात्मा, ग्रंथ प्रामान्यता, कर्मकांड, नवस, यज्ञकृ वगैरे बाबींमध्ये मानव बंधीस्त होऊन विज्ञानापासून कोसो दूर जात आहे. एखादा रोगी गंभीर आजारी असला तर डॉक्टर रोग्याला वाचवण्याचे कार्य सर्व प्रकारे प्रयत्न सोडून देतात. परंतु जे लोक, जो देश विज्ञान वादी आहे, ते लोक किंवा तो देश आपली प्रगती करुन घेतो. बाकीचे लोक नुस्त शब्दांचा किस पाडत बसतात. इतर धर्म व तत्वज्ञानात आत्मा आहे. परंतु पालि साहित्यात आत्मा नाही. त्यामुळे आत्म्याचा पुनर्जन्म नाही. आत्मा, त्याच अस्तित्व व त्याचे खंडण पालि साहित्यात पुढील प्रकारचे आहे.

**आत्म्याचे अमरत्व :–**

आत्मा हा अजरमर आहे. मृत्यूच्या वेळी अन्नमय कोशात्मक स्थूल देहाचा त्याग करुन लिंग शरीरयुक्त आत्मा परलोकी जातो आणि कार्यफळानुसार नवे नवे जन्म घेत राहतो.[1] आत्म्याबरोबर पंच (सूक्ष्म) भूते, मन, इंद्रिय, प्राण, व धर्म असे अठरा तत्व मष्त्यूच्या वेळी निघून जातांना दुसऱ्या देहात प्रवेश करतात.[2] जसे आपण कपडे बदलतो तसा आपला आत्मा देह बदलतो. असे गीतेत सांगीतले आहे. आत्मा हा निर्गुन निराकार आहे. जशी हवा आहे. परंतु ती दिसत नाही, विद्यूत आहे, ती सुद्धा दिसत नाही. भूक लागते परंतु दिसत नाही, तसाच आपला आत्मा आहे परंतु दिसत नाही. असे माानले जाते. हवा, विद्युतकृआहे, ते दिसत नाही परंतु त्याचा गुण दर्शवितात परंतू आत्मा हा त्याचे गुण दर्शवित नाही. कारण आत्माच नाही. तरीही त्याचे अस्तीत्व मानने योग्य नाही. आत्म्याच अस्तीत्व मानणारे एवढ्यावरच थांबले नाही तर या काल्पनिक आत्म्याचे

जिवंत आत्मा, मष्त आत्मा, भटकता आत्मा, अतष्प आत्मा, संतुष्ठ आत्मा, महात्मा, मोठा आत्मा, छोटा आत्मा, अशा प्रकारे आठ प्रकार निर्माण केले आहे. कांही विद्‌वानांच्या मते आपण झोपतो तेंव्हा आपल्या देहातील छोटा किंवा मोठा आत्मा बाहेर जातो. तो बाहेर गेल्यावर ज्या कांही घडामोडी करतो. हे आपल्या देहातील आत्म्याला संदेश पाठवतो. ते आपल्याला स्वप्नात दिसते. आणि आपणास अचानक जाग आली तर बाहेर गेलेला आत्मा बाहेरच राहतो. पुन्हा झोपल्या नंतर परत येतो.

अशा प्रकारे आत्म्याचे अस्तीत्व सांगण्यासाठी बालीश पनाचे प्रदर्शन केले जाते.

आपण सूर्य बघीतला आहे. आपल्या पुर्वजांनी सुद्धा बघीतला आहे. कारण त्याचे अस्तित्व आहे. तरीही त्याला प्राप्त करण्यासाठी त्याच्यावर जाण्यासाठी आतापर्यंत उपायशोधून काढला नाही. परंतु मेल्यानंतर स्मशानभूमीत कावळा पिंडाला शिवला तर ते आपल्या स्वर्गीय आत्म्यास पोंहचते. (मेल्या नंतर स्वर्ग प्राप्त होतो.) असे मानतात. तेंव्हा पिंडाजवळ एकच कावळा आला तर तो कावळा आहे की कावळी आहे हे कसे ओळखणार आणि जर एका पेक्षा जास्त कावळे आले तर नेमका तुमचा तो किंवा ती कोणती ?

**अनित्य :–**

बुद्ध म्हणतात ज्याला जन्म आहे त्याला मष्त्यू आहे, ज्याचा उगम आहे. त्याचा अस्त आहे, ज्याला सुरुवात आहे, त्याला शेवट आहे, सर्व कांही अनित्य आहे. जगातील एकही बाब नित्य नाही. त्यामध्ये सतत बदल परिवर्तन होत असते. या तत्वाप्रमाणेच आत्म्याची संकल्पना चुकीची आहे. तरीही कांही तत्वज्ञानात आत्मा हा अजरमर आहे त्यांचा अंत, नाश, मष्त्यु होत नाही असे मानतात.

आत्म्यांची संख्या जेंव्हा आत्म्याची संकल्पना उदयास आली तेंव्हा ज्ञान असलेली लोक संख्या 33 कोटी होती. म्हणून 33 कोटी आत्मे आहेत. त्यालाच पुढे चालून 33 कोटी देव आहेत असा समज झाला. परंतु ही सर्व आकडेवारी काल्पनिक आहे. कारण आता जग कॉम्प्युटराईज्ड झालेले आहे. त्यामुळे कॉम्प्युटरला आदेश दिल्याने कोणतीही माहिती क्षणातच उपलब्ध होते. आणि क्षणातच 33 कोटी देवतांच्या नावाचा कोश तयार होतो, परंतु तसे होत नाही. प्रत्यक्षात गल्ली पासून दिल्ली पर्यंत प्रत्येक गल्ली बोळातील देव–देवतांची गणणा केली तर 100 च्या वर आकडा जाणार नाही.

**संत कबीर :–**

संत कबीराच्या गावातील एका प्रतीष्ठीत व्यक्तीचा मष्त्यू झाला होता. समाजातील सर्व स्तरातील लोक दुःखात सहभागी होते. दिवसाचा कार्यक्रम करण्यासाठी कांही लोकांवर जबाबदाऱ्या दिल्या होत्या. तेंव्हा पुजेचे साहित्य उपलब्ध करण्याची जबाबदारी कबीरावर होती. तेंव्हा कबीराने ती जबाबदारी स्विकारली परंतु ऐन वेळी ते नदीवर जावून बसले. सर्व लोक त्यांची वाट पाहत होते. शेवटी कबीर दिसला नाही म्हणून इतरांनी ती जबाबदारी पूर्ण करुन स्मशानभूमीकडे निघाले असता कबीर नदी मध्ये पाण्यात उभे राहून दुरवर असलेल्या आपल्या मष्त्यु गाईच्या दिशेने ओंजळीने पाणी फेकत होते आणि "गाई–गाई पाणी पी" असे म्हणत होते. तेंव्हा लोकांनी त्यांना पाहून असे म्हणाले "अरे कबीर मेलेली गाय पाणी पिते काय? हे पाणी त्या गाई पर्यंत पोहचते काय ? गाय तर फार दुर आहे." तेंव्हा कबीर म्हणाले, माझी गाय तर माझ्या समोर आहे. परंतु तुझ्या मेलेल्या बापाचं अजीबात अस्तित्व नसतांना जर हा पिंड तुझ्या बापाला पोहचत असेल तर हे पाणी माझ्या गाईला का पोहचणार नाही.

आत्मवादाचे खंडण करतांना तथागत बुद्ध म्हणतात, जे गाव अस्तित्वात नाही त्या गावचा रस्ता सांगणे चुकीचे आहे. तसे आत्म्याचे अस्तीत्व नाही तरीही त्याला प्रसन्न

करण्याचे उपाय सांगणे चुकीचे आहे. त्याही पलीकडे जाऊन भगवान बुद्ध म्हणतात की, समजा एखादा अभियंता[3] चौकात जीना तयार करीत आहे. जीन्याचे बांधकाम करत आहे. त्याला जर कुणी विचारल की, ज्या इमारतीवर जाण्यासाठी जीना तयार करीत आहात. ती इमारत एक मजली आहे का ? अनेक मजली आहे ? कोणत्या दिशेला आहे तेव्हा जर तो अभियंता त्या इमारती विषयी निश्चित असे ठिकाण सांगू शकत नाही तरीही जीना तयार करत असेल तर ते किती चुकीचे आहे.

पुन्हा भगवान बुद्ध म्हणतात की, "एखादा व्यक्ती म्हणत असेल की, मी एका मुलीवर प्रेम करतो,[4] ती पण माझ्यावर प्रेम करते ती फारच सुंदर आहे." असे सांगत असेल परंतु त्याला विचारले की, तू ज्या मुलीवर प्रेम करतोस ती मुलगी उंच आहे का ठेंगु? काळी आहे का गोरी? कोणत्या गांवची आहे? त्यावर जर तो व्यक्ती काहीच निश्चित अशी माहिती सांगत नसेल तर तेही चुकीचे आहे. असेच आत्म्यासंबंधीचे मत आहेत. ज्याचे अस्तित्व नाही तरीही किंवा दोन मिनीट शांतपणे उभे राहून श्रद्धांजली देणे. इत्यादीवर योग्यप्रकारे विचार करणे आवश्यक आहे. मृत्यू नंतर देहातून निघून दुसऱ्या देहामध्ये प्रवेश करणारी आत्मा नावाची कोणतीही चिज वस्तू नाही. तर मष्त्यू नंतर या देहाचे पृथ्वी, आप, तेज, वायू, आणि आकाश हे घटक निसर्गातील त्या त्या महाघटकामध्ये विलीन होतात. हा आत्म्याचे अस्तित्व न मानणारा वाद भन्ते नागसेनानेपुढील उदाहरणे देऊन स्पष्ट केला आहे. (बुद्ध तत्वज्ञानामध्ये) येथे आत्म्याचे अस्तित्वच नसल्यामुळे आत्म्याला शांती मिळविण्यासाठी केल्या जाणाऱ्या कर्मकांडास मुळीच थारा नाही. राजा मिलिन्दाचे प्रश्नांचे उत्तर देतांना भन्ते नागसेनाने त्याचे 3 उदाहरण देवून अनात्मवादाचे स्पष्टीकरणात्मक चातुर्यपुर्वक समर्थन केले आहे. राजा मिलिंदाने भन्ते नागसेनास त्यांच्या नावासंबंधीचे प्रश्न विचारले असता भन्ते नागसेन म्हणतात. की, माझे सहब्रम्हचारी मला नागसेन या नावाने ओळखतात परंतु नागसेन नावाचा पुरुष (आत्मा) अस्तित्वात नाही तर तो केवळ तो व्यवहारिक शब्द आहे. तेंव्हा राजाने म्हटले की, मग नागसेन म्हणजे काय आहे ? केस नागसेन आहेत काय ? रोम नागसेन आहेत काय ? नखे नागसेन आहेत काय ? हाड, मांस,कृकृनागसेन आहेत काय ? अशा विविधा घटकांचा नामोल्लेख करुन हे नागसेन आहे काय ? असे प्रश्न विचारले त्यावर भन्ते नागसेन म्हणतात, हे नागसेन नाही. तर मग भन्ते मी आपणास विचारुन थकलो. आता नागसेन काय आहे हे आपणच सांगा. तेंव्हा भन्ते नागसेनानी मिलिंद राजास वरील प्रमाणेच रथ म्हणजे काय ? असा प्रतिप्रश्न विचारुन त्यांच्याच तोंडून उत्तर काढून घेतले. उत्तर देतांना राजा मिलिंद म्हणाले की, भन्ते रथाच्या विविध अवयवांच्या आधारवरच केवळ व्यवहारासाठी रथ हे नाव (संज्ञा) आहे. भन्ते नागसेन म्हणाले की, महाराज या प्रमाणेच सर्व अवयव व स्कंधाच्या आधारावरच नागसेन ही एक व्यवहारिक संज्ञा आहे. नागसेन नावाचा पुरुष (आत्मा) नाही.[6] 'ईसं च परिच्चं, अक्खच, पटिच्च, चक्कानिच पटिच्च, रथ–पय्जरं च, रथ दण्डक च, पटिच्च रथे' ति सङ्खा समय्या पय्यति वोहारो नाममत्तं पयत्सपती' ति।। एव मेव खो महाराज मरहम्पि केसे च पटिच्च' लोमेच्च पटिच्चकृकृपे नखा, दन्ता, तचो, मंस, नहारु, अठ्ठिमिरज वक्कं, हदय, यकनं, किलेमकं फफासं अन्तं, अन्नगुणं, उदरियं, करीसं, पित्तं, सेन्ह, पुष्णो, लोकितं, सेदो, अस्सु, वसा खोने, सिङघणिका लसिका, युत्तं, मत्थके, मत्यलुङ गच रुप, चं वेदनंच, सरयं च, सङखानेच, विरयाण च, पटिच्च नागसेनो' ति सङख समस्या पय्यति वोहारो नाममत्तं पवत्त ति परमत्थतो पनेय पुग्गलो नू पलव्यति।।[7]

त्याचप्रमाणे आत्मवादाचे खंडण करतांना भन्ते नागसेनांनी खिडकीयुक्त महालाचे उदाहरण देवून

अनात्मवादाचे समर्थन केले आहे. ते असे जेंव्हा आत्म्याचे स्पष्टीकरण करतांना राजा मिलिंद म्हणतात. की, भन्ते ज्या प्रमाणे आम्ही प्रासादा मध्ये बसून इच्छेनूसार पूर्व, पश्चिम, उत्तर, किंवा दक्षिण इत्यादी कोणत्याही खिडकीतून[6] बाहेरची दष्र्य पाहू शकतो. त्याचप्रमाणे आत्मा आपल्या शरिरात राहून डोळ्याद्वारे रुप पाहतो. कानाद्वारे शब्द ऐकतो, नाकाद्वारे सुगंध घेतो, जिभेद्वारे आस्वाद घेतो. काये द्वारे स्पर्श करतो, आणि मनाद्वारे धर्म जाणतो तो आत्मा मानवी शरिरामध्ये आहे. तेंव्हा भन्ते नागसेन पुढील प्रमाणे राजा मिलिन्दाला प्रत्युत्तर देतांना म्हणतात. यदि जीवो नु पलब्मती अथ खो चरहि चक्खुनां रुप पस्यति सोतेन सद्धं सुणति, घानेन गन्ध ा घायति, जिव्हाय सरं सायति, कायेन फोट्टब्बा फुसति, मनसा धम्म विजानति ति सो जीवो चक्खुद्वारेसु उप्पटिनेसू महन्तेन आकासेन बहिमुखो सुदि्ठतरं रुप परयेस्य सोतेसु उत्पटितेसु धानेन उत्पटिते जिव्हाय उत्पटिताय काये उत्पटिते महन्तेन आकासेन सुद्ठतरं सद्धं सुणेय्य गंध ध ाायेय्य रसं धायेय्य फोट्टब्बा फुसेय्या ति।।[7]

तेव्हा भन्ते नागसेन म्हणतात, 'महाराज ज्या खिडकीद्वारे तुम्ही बाहेरील दष्र्ये पाहता त्या खिडक्या पूर्णपणे काढल्या तर अधिकच चांगल्या प्रकारे बाहेरील दष्र्य पाहता येईल. आणि जर त्या सर्व भिंतीच काढल्या तर सर्व कांही खुल्ले आम पाहता येईल. जसे ज्या डोळेरुपी खिडकीतून दष्र्य पाहता ती डोळेरुपी खिडकी पूर्णपणे काढून टाकली तर आत्मा अधिकच. चांगल्याप्रकारे बाहेरील दष्र्य पाहू शकेल. कानरुपी खिडकी पूर्णपणे कापून काढली तर पूर्वी पेक्षा आत्म्याला जास्त ऐकू येईल. नाकरुपी खिडकी पूर्णपणे कापून टाकल्यास अधिक चांगल्या प्रकारे सुगंध घेता येईल. जिभ, काया, आणि मन रुपी खिडक्या काढून टाकल्या तर अधिक चांगल्या तऱ्हेने आस्वाद चाखता येईल. स्पर्श अनुभवता येईल, धर्म जानता येईल अशा प्रकारे सर्व खिडक्याच नव्हे, तर सर्व भिंतीही पूर्णपणे काढल्या तर आत्म्याला अधिक उघडपणे खुल्लेआम बाह्य बाबींचा स्पष्टपणे अनुभव घेता येईल. अशा प्रकारे आत्मवादाचे खंडण केले, तेंव्हा राजा मिलिन्द निशःब्ध झाला. हे राजाचे नकारात्मक उत्तर मिळताच भन्ते म्हणाले, ते ते इन्द्रिय आपापली कार्य करतात त्यामुळेच आपण पाहतो. ऐकतो, सुगंध घेतो, आस्वाद चाखतो, स्पर्श अनुभवतो, जाणतो, पण ह्या देहामध्ये आत्मा नावाची कोणतीही चिजवस्तू नाही.[10]

वरील प्रकारे आत्मवादाचे खंडण पालि, साहित्यात विज्ञानवादी दृष्टीकोणातून करण्यात आले आहे. आपल्या संपूर्ण देहाचा सी. टी. स्कॅन केला तर आपल्या देहातील अति सूक्ष्म कण सुद्धा आपण पाहू शकतो. सूक्ष्मदर्शीकेतून तपासणी करु शकतो. परंतु त्यामध्ये आत्म्या नावाची चीज कुठेही दिसून येत नाही. ज्या घटकांचा आपला देह बनला आहे त्या पंचमहाभूताचे विघटन म्हणजे मष्र्यू आणि पुन्हा एकत्रिकरण म्हणजे पूनर्जन्म होय. परंतु आत्मा नावाची चीज नाही.

## संदर्भ सूची :-


1 पा. नं. 457, धर्मांचे तत्वज्ञान, ज. वा. जोशी, 1975, पुणे

2 पा. नं. 456, वरील.

3,4 पा. नं. 58, बौद्ध धर्म में अनात्मवाद, डॉ. धर्म किर्ती, 1998, दिल्ली.

5 पा. नं. 22 मिलिन्द प्रश्न, मा. फ. गांजरे, 1972, नागपूर

6 पा. नं. 27 मिलिन्द पन्हो, आर. डी. वाडेकर, 1940, मुंबई

7 पा. नं. 29, 30 वरील.

8 पा. नं. 57, 89 वरील.

9 वरील.

10 वरील.